# दिनांक 03/10/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 50

विषय – विटा येथील नगरपरिषद हद्दीत सभागृह बांधणेकामी नगररचना विभागाकडून अभिप्राय व आराखडयास मंजूरी मिळणेबाबत उपविभागिय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग विटा यांचेकडील दाखल दिनांक 26/08/2022 रोजीचे अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ-दिनांक 03/10/2022 ने रचना सहाय्यक, सहाय्यक नगररचनाकार व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

विटा येथील नगरपरिषद हद्दीत सभागृह बांधणेकामी नगररचना विभागाकडून अभिप्राय व आराखडयास मंजूरी मिळणेबाबत उपविभागिय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग विटा यांचेकडील दाखल दिनांक 26/08/2022 रोजीचा अर्ज प्राप्त झाला आहे. सदर नकाशात दर्शविलेली जागा ही विटा शहर विकास योजना (दुसरी सुधारीत) नुसार म्युन्सीपल पर्पज आ.क्र.48अ या कारणासाठी आरक्षित आहे. सदर कामास नगररविकास विभाग शासन निर्णय क्रं.नपावै-2022/प्र. क्र.138अ/(38)नवि-16 मुबंई ने निधी प्राप्त झाला आहे. तरी प्रभाग क्रं. 5 नेहरूनगर येथील आरक्षित जागेमध्ये खंडोबा मंदिर व मरिमी मंदिरा समोर सभागृह बांधणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 03/10/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 51

विषय – मौजे विटा येथील गट नं.809 (सि.स.नं.3227) आरक्षण क्रमांक 47 (ई.पी.क्र. 23) गार्डनचे आरक्षण वगळणेबाबत श्री.सदाशिव भिमराव सपकाळ व श्री.हणमंतराव भिमराव सपकाळ यांचे दाखल दि.16/09/2022 रोजीचे अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 28/09/2022 ने रचना सहाय्यक, सहाय्यक नगररचनाकार व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

मौजे विटा येथील गट नं.809 (सि.स.नं.3227) आरक्षण क्रमांक 47 (ई.पी.क्र. 23) गार्डनचे आरक्षण वगळणेबाबत श्री.सदाशिव भिमराव सपकाळ व श्री.हणमंतराव भिमराव सपकाळ यांनी दि.16/09/2022 रोजीचे अर्जाने विनंती केली आहे. सदरचे आरक्षण वगळणेबाबत यापुर्वी नगरपरिषदेने सर्वसाधारण सभा ठराव क्र.5 दि.20/04/2016 ने ठराव करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये गौणफेरफार करुन बगीचाचे आरक्षण वगळणेबाबत गौणफेरफार करणेस मंजुरी दिली होती. तसेच दि.18/05/2016 रोजी स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देवुन सुचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि.22/06/2016 ने राजपत्रात प्रसिध्दी दिली होती. तथापि विहीत मुदतीत एकही सुचना व हरकत प्राप्त झालेली नसलेने या गौणफेरफारास विशेष ठराव क्र.119 दिनांक-29/09/2016 नुसार अंतिम मंजुरी दिलेली होती. त्यानुसार प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी पाठविणेत आला होता.तथापि त्यानंतरची पुढील कार्यवाही विहीत मुदतीत न झालेने अर्जदार श्री.सपकाळ यांनी पुनश्च सदरचे आरक्षण वगळणेबाबत ठराव करणेकामी विनंती अर्ज केला आहे.

तरी गट नं.809 (सि.स.नं.3227) आरक्षण क्रमांक 47 (ई.पी.क्र. 23) गार्डनचे आरक्षण वगळणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये गौणफेरफार करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-<br>( संतोष भोर)<br>प्रशासक<br>विटा नगरपरिषद, विटा